**निशाणी क्र. १७**

**आरोपीचा सरतपास**

देवाची शपथ खरे सांगतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | भारत मधुकरराव चुनडे, |
| वय | – | ४० वर्षे, |
| धंदा | – | सोनार, |
| राहणार | – | अकोला, ता. अकोला, जि. अकोला. |

------

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. आर.एस. मापारी यांच्यामार्फत**

०५. मी इयत्ता बारावी पर्यंत शिकलेलो आहे. मी अभिलेखावर शॉप ॲक्ट परवाना दाखल केलेला नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, शॉप ॲक्ट परवाना बंद झाल्यामुळे निशाणी क्र. २५ वर उद्योग आधार दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी व आरोपी एका समाजाचे असुन एका गावात राहतो. आरोपीने माझ्या दुकानातुन दिनांक १४ मार्च, २०१९ रोजी एक मंगळसुत्र व एक बदाम अंगठी विकत घेतले होते. आरोपीने घेतलेल्या मालाचे बिल मी दाखल केले नाही. परंतु, साक्षीदार ते बिल पुढील तारखेस दाखल करण्यास तयार आहे. दिनांक १४/०३/२०१९ रोजी आरोपीने माझ्याकडुन एकूण विस ग्रॅम सोने विकत घेतले होते. माझ्या दुकानामध्ये किती सोने आणले व किती विकले याची नोंद असते. त्याबाबतचा कुठलाही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. मी दरवर्षी कर भरत नाही. परंतु मी दरवर्षी आयटीआर भरतो.

०६. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व माझे ओळखीचे संबंध आहे. मी ग्राहकांकडुन विकलेल्या मालाचा मोबदल्याच्या स्वरुपात क्व्चीत धनादेश घेत

असतो. आरोपीने माझ्या दुकानातुन पाच ते सहा वेळेस सोने विकत घेवुन पन्नास ते साठ हजाराचे व्यवहार केले आहे.

**पुढील उलटतपास निशाणी क्र. ३१ वरील आदेशाप्रमाणे तहकुब.**

समक्ष,

सही/–
**(आर. ए. मिसाळ)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
नांदुरा.

नांदुरा
दिनांक – २७/०९/२०२२.

– – – – –